**प्रभाग क्र.४५ येथे "स्वातंत्र्य सैनिक लिंगैक्य गुरय्या सुत्रय्या स्वामी चौक" चौक नामकरण फलकाचे उद्‌घाटन**

सोलापूर दि.१०/०९/२०१५: सोलापूर महानगरपालिकेच्या प्रभाग क्र.४५ येथे आज दि.१०/०९/२०१५ रोजी सकाळी १०.०० वाजता इंद्रजित मेडिकल समोरील चौकास स्वातंत्र्य सैनिक लिंगैक्य गुरय्या सुत्रय्या स्वामी चौक म्हणून मा.महापौर सुशीलाताई आबुटे यांच्या शुभ हस्ते नामफलकाचे उद्घाटन करुन परिसरात वृक्षारोपण करणेत आले.

याप्रसंगी कार्यक्रमाची सुरुवात हेमंतकुमार यांनी भक्ती गतीने सादर केले.स्वामी सर यांनी कै.स्वांतत्र्य सैनिक लिंगैक्य गुरय्या सुत्रय्या स्वामी यांचा अल्पपरिचय सांगितले लिंगैक्य गुरय्या सुत्रय्या स्वामी हे मुळ मौजे केसरजवळीगी जिल्हा उस्मानाबाद असून त्यांच्या जन्म स्वांतत्र्य पूर्व काळात दि.१९/१०/१९१८ रोजी केसरजवळगी येथे झाला त्यांनी कष्टाळू प्रामाणिकपणं योगी जीवन जगले

यावेळी मा.महापौर सुशीलाताई आबुटे बोलत होत्या कै.स्वातंत्र्य सैनिक लिंगैक्य गुरय्या सुत्रय्या स्वामी हे महात्मा गांधी यांच्या राष्ट्र प्रेमाने प्रेरित होऊन स्वातंत्र्य लाढयात सहभाग होवून हैद्राबाद निजामाच्या तावडीतून मुक्त होण्यात सहभाग घेतले होते.मृत्युनंतर त्यांचा देहांचा वैद्यकीय क्षेत्रातील विद्यार्थ्यांना उपयोगी व्हावी म्हणून देहदान करुन मरणानंतर ही देहाची समाजासाठी उपयोगी पडण्याचे कार्य केले आहेत.म्हणून या चौकास आज पासून लिंगैक्य गुरय्या सुत्रय्या स्वामी चौक म्हणून नामकरण करुन फलाकचे उद्‌घाटन केले आहे.

याप्रसंगी नगरसेवक नरेंद्र काळे,स्वीकृत सदस्य शैलेंद्र आमणगी,ए.जी.पाटल यांनी ही आपले विचार व्यक्त केले. याप्रसंगी अशोक पाटील , एम.जी.स्वामी,धनेश स्वामी,महेश अंदेली,विभागीय अधिकरी मठपती,राजश्री बिराजदार,प्रशांत हत्तुरे,कर्नल लांडगे,अरविंद लोणी,शिवप्पा कोरे आदी नागरीक उपस्थित होते.

मा.संपादक,

-------------------

-------------------

उपरोक्त बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करणेस विनंती आहे.

जनसंपर्क अधिकारी
सो.म.पा.